## समारोप

या प्रबंधामध्ये माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाचा व प्राथमिक भू-विकास बँकेचा अभ्यास केला आहे.

या अभ्यासाचे महत्वाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे -

१) माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेची स्थापना १९२२ मध्ये झाली १९८७-८८ मध्ये या संस्थाची संख्या ८१ झाली. तसेच या वर्षी माढा तालुक्यातील सर्व खेडी व्यापण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात या संस्थाना यश आले आहे.

२) माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच्या प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत या संस्थाच्या सभासद संख्येत ६,९८९ नी वाढ झाली आहे. तर एकूण सभासद संख्येपैकी कर्ज घेतलेल्या सभासद संख्येत ६ टक्केनी वाढ घडून आली.

३) माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच्या प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत एकूण कर्ज वाटपात (अल्प + मध्यम मुदत) ५२२.८५ टक्केनी वाढ झालेली आहे.

४) माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थामध्ये हंगामी पिकांसाठी पीक कर्ज योजना अस्तित्वात आहे. या योजनेचा प्रमुख हेतू उत्पादनवाढीला चालना देणे हा आहे. असे कर्ज वस्तुस्वरूपात व पैशाच्या स्वरूपात दिले जाते. प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत सरासरी ७५ टक्के कर्ज हे पैशाच्या स्वरूपात दिले जाते. तर २५ टक्के कर्जच वस्तुच्या स्वरूपात दिले जाते. पण एवढेही कर्ज या संस्था स्वत: वस्तु स्वरूपात देत नाहीत. कर्जदाराला मालाची पावती आणून दाखविण्याला सांगितले जाते व ती पावती ग्राहय मानून तेवढी रक्कम दिली जाते. अशा पध्दतीने वाटल्या जाणा-या वस्तु कर्जामध्ये कर्जदाराकडून गैरव्यवहार केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वस्तुतील कर्ज स्वत: या संस्थानीच देणे अधिक योग्य होईल.

५) माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थानी प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत शेतीला दिलेली अल्पमुदत कर्जे वाढली असली तरी शेतीचा विकास ज्यांच्यावर अवलंबून आहे त्या सीमांत व लहान शेतक-यांना कर्जे देण्याबाबतची कामगिरी समाधानकारक नाही. मोठया शेतक-यांनाच अधिक कर्जे दिलेली दिसून येतात. १९८३-८४ ते १९८७-८८ या कालावधीत एकंदर अल्पकर्जापैकी ९१ टक्के कर्जे मध्यम व श्रीमंत शेतक-याना तर फक्त ९टक्के कर्जे लहान व सीमांत शेतक-यांना मिळतात. अशीच प्रवृ-ती मध्यम मुदतीच्या कर्जाबाबतही आढळते. ही घटना निश्चितच गंभीर आहे.

६) प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची माढा तालुक्यातील थकबाकी प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत १३२ टक्केवरून २५ टक्केपर्यंत घटलेली दिसून येते. ही घटना शेतीसाठी कर्ज देण्याच्या दृष्टीने निश्चीतच स्वागतार्ह आहे.

७) माढा तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या भाग भांडवलात प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत निव्वळ वाढ ७६ टक्केनी झाली तर खेळत्या भांडवलातील निव्वळ वाढ ५२ टक्केनी झाली आहे.

संस्थेच्या भाग भांडवलाचे खेळत्या भांडवलाशी प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीतील प्रमाण १८ टक्केवरून १५ टक्केपर्यंत कमी झाले आहे.

८) माढा तालुक्यात अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणा-या संस्था शिवाय दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी १९५९ मध्ये भू-विकास बँकेची स्थापना करण्यात आली.

९) माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचे दीर्घमुदत कर्जवाटप १९८३-८४ मध्ये ९.६२ लाख रूपयांवरून ते १९८७-८८ मध्ये ३.७२ लाख रूपयांपर्यंत कमी झाले आहे. यातील घट ५.९० लाख रूपयांनी झाली आहे. ही घटना शेती विकासाच्या दृष्टीने अडथळयाची समजली जाते.

१०) माढा तालुक्यातील भू-विकास बँकेने प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत सर्वात अधिक कर्जे मोठया शेतक-यांनाच दिलेली दिसून येतात.

११) माढा तालुक्यातील भू-विकास बँकेने तालुक्यातील पश्चिमेकडील ऊजनी कालव्यामुळे कांही भागास होणारा पाणीपुरवठा वगळता संपूर्ण तालुक्यातील शेती ही विहीरीवरील पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे अधिक कर्जे ही नविन विहिरीसाठी व जुन्या विहिरी दुरुस्तीसाठी दिली आहेत. याचे प्रमाण अभ्यासाच्या कालावधीत एकूण कर्जाच्या जवळजवळ ७० टक्के आहे. (यातील १९८७-८८ हे वर्ष वगळता)

१२) माढा तालुक्यातील भू-विकास बँकेचे १९६७ साली भाग भांडवल २.४५ लाख रूपयावरून १९८७-८८ मध्ये १४.२० लाख रूपयापर्यंत वाढले.

तर प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत कर्जदार सभासद संख्येत २१२ नी वाढ झाली आहे.

१३) माढा तालुक्यातील भूविकास बँकेच्या कर्जवसूलीत प्रस्तुत अभ्यासाच्या कालावधीत २५ टक्केवरून ४९ टक्केपर्यंत वाढ झालेली दिसून येते आहे.